**Bachelor of Arts (B.A.) Part—II Examination**

**MARATHI (New)**

**(Compulsory)**

**(Other Language)**

वेळ : तीन तास] [एकूण गुण : 100

1. एक यशस्वी वक्ता म्हणून आचार्य अत्रे ह्यांची जडणघडणा कशी झालेली आहे ? 10

**किंवा**

पु.भा.भावे ह्यांनी तपस्वींच्या त्यागी व करूणामय व्यक्तिमत्त्वाचे कोणकोणते पैलूं उलगडून दाखविले आहे.

2. संत नामदेवांनी विठ्ठलभक्ती चे व नामस्मरणाचे महत्व आपल्या अभंगातून कशाप्रकारे अभिव्यक्त केलेले आहे. 10

**किंवा**

सुरेश भटांनी आपल्या कवितेतून 'मृत्यू' हेच अंतिम सत्य असल्याची जाणीव कशाप्रकारे करून दिलेली आहे.

3. पुढीलपैकी कोणत्याही **एकाच** गटातील प्रश्नांची उत्तरे लिहा : 20

**गट 'अ'**

(क) ताराबाई शिंदे यांनी पतिव्रता स्त्रियांबद्दल कोणते विचार प्रकट केलेले आहे.

(ख) यशस्वी वक्त्याची कोणती लक्षणे आचार्य अत्रे ह्यांनी सांगीतलेली आहेत ?

(ग) संत नामदेवांनी श्री विठ्ठलाच्या लावण्याची शोभा कशी प्रकट केलेली आहे ?

(घ) राम जोशी ह्यांनी आपल्या लावणीतून मनुष्याळा कोणता उपदेश केलेला आहे ?

**किंवा**

**गट 'ब'**

(च) शिक्षक हा सर्वश्रेष्ठ कलावंत असतो. असे राष्ट्रसंतांनी का म्हटले आहे ?

(छ) दुर्गा भागवत ह्यांनी माघ महिन्याचे वर्णन कशाप्रकारे केलेले आहे ?

(ज) सुरेश भटांनी आपल्या कवितेतून मृत्यू संवेदना कशी प्रकट केलेली आहे ?

(झ) 'कायदा सुव्यवस्था मलाच सांभाळायची आहे, असे कुसुम आलाम का म्हणतात ?

4. पुढीलपैकी कोणत्याही **एकाच** गटातील प्रश्नांची उत्तरे लिहा : 20

**गट 'क'**

(त) इतिवृत्त लिहिताना कोणती काळजी घ्यावयाची असते ?

(थ) आकाशवाणी आणि चित्रवाणी यावरील बातम्यांचे लेखन कशा स्वरूपाचे असते ?

(द) इंग्रजीतून मराठीत भाषांतर करताना दोन्ही भाषांचे कोणते रचनाविशेष लक्षात ठेवावेत ?

(ध) मुलाखत लेखनाचे तंत्र लिहा ?

**किंवा**

**गट 'ख'**

(प) एखाद्‌या सभेच्या इतिवृत्त लेखनाचा नमूना लिहा.

(फ) बेटी बचाव : अभिनव मिखणूक' याची बातमी तयार करा.

(ब) भाषांतर विद्येचे स्वरूप लिहा.

(भ) मुलाखत घेणाऱ्या व्यवतीने मुलाखत घेण्यापूर्वी कशी तयारी करावी ? सविस्तर लिहा.

5. खालील सर्व प्रश्नांची उत्तरे लिहा : 20

(1) दुष्ट प्रवृत्ती पराभूत व्हावी यासाठी नवी पहाट उगवत आहे. असे निर्मलकुमार फडकुले ह्यांनी का म्हटलेले आहे ?

(2) डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे नव्या भारताचे युग पाहत होते याची जाणीव लेखकांनी कशाप्रकारे करून दिलेली आहे ?

(3) कवी अनिलांच्या 'विराणी' तून कवीमनातील उदासीनतेचे दर्शन कशाप्रकारे घडले आहे ?

(4) समाजातील वास्तवदर्शनातून संघर्षाची चिंगारी नारायण सुर्वे ह्यांच्या मनात कशाप्रकारे प्रज्वलित झालेली आहे ?

6. खालील वस्तुनिष्ठ प्रश्नांचे योग्य पर्याय निवडा : 20

(१) श्री चक्रधरस्वामींनी रूंभणेयाचा दृष्टांत कुठे सांगीतला ?

(अ) देहू (ब) आळंदी

(क) पैठण (ड) पंढरपूर

(२) स्त्रीपुरूषतुलना हा ग्रंथ कोणी खिहिला ?

(अ) रमाबाई रानडे (ब) इरावती कर्वे

(क) दुर्गा भागवत (ड) ताराबाई शिंदे

(३) कुणाच्या भाषणात 'हशा आणि टाळयां'चा वाक्यावाक्याला गजर होत होता ?

(अ) निर्मलकुमार फडकूले (ब) शिवाजीराव पटवर्धन

(क) आचार्य अत्रे (ड) पु.ल. देशपांडे

(४) पंढरपुरातील स्थानांचे वर्णन पं. महादेवशास्त्री जोशी ह्यांनी कोणत्या पाठातून केलेले आहे ?

(अ) विटेवरचे परब्रह्म (ब) विटेवर उभा श्रीरंग

(क) कर कटावरी (ड) आत्मपुराण

(५) शिक्षकाच्या कर्तव्याची जाणीव करुन देणारे भाषण राष्ट्रसंतानी कुठे दिलेले आहे ?

(अ) मुंबई (ब) नागपूर

(क) जपान (ड) गुरूकुंज आश्रम मोझरी

(६) 'श्लोक केकावली' हे काव्य कुणी लिहिले ?

(अ) रघुनाथ पंडीत (ब) मोरोपंत

(क) दामोदर पंडीत (ड) भास्करभट्ट बोरीकर

(७) हा माझाही देश; आणि त्यातील हे पोकेपोकेसे लोक आपल्या घरालाच असे पोकेपण यावे; तर काय करावे ? हे काव्य कुणी लिहिले ?

(अ) मर्देकर (ब) केशवसुत

(क) नारायण सुर्वे (ड) लोकनाथ यशवंत

(८) 'मी असा आनंदुनी बेहोष होता, शब्दगंधे, तूमला बाहूंत घ्यावे !' हे काव्य कुणी लिहिले ?

(अ) ना.धो. महानोर (ब) भाऊ पंचभाई

(क) नारायण सुर्वे (ड) ना.ध. देशपांडे

(९) 'कायदा सुव्यवस्था मला सांभाळायची आहे !' असे कुणी म्हटले ?

(अ) यशवंत मनोहर (ब) नारायण सुर्वे

(क) अंजनाबाई खुणे (ड) कुसुम आलाम

(१०) 'डोले' ही कविता कुणी लिहिली ?

(अ) भाऊ पंचभाई (ब) यशवंत मनोहर

(क) सुरेश भट (ड) अनिल.

(११) 'इतिवृत्त' किंवा 'नोंदी' या संज्ञेचा अर्थ कोणता ?

(अ) बातमी (ब) टिप्पणे

(क) भाषांतर (ड) पत्रलेखन

(१२) अहवालात्मक इतिवृत्त कशा स्वरूपाचे असते ?

(अ) रचनात्मक (ब) वर्णनात्मक

(क) प्रश्नात्मक (ड) चिकित्सक आणि विश्लेषणात्मक

(१३) बंदुकीपेक्षाही वर्तमानपत्राची भीती राज्यकर्त्यांना नेहमी वाटत आली आहे असे वृत्तसंस्थेचे वर्णन कुणी केले ?

(अ) रसेल (ब) कार्लाईल

(क) ब्रेख्स (ड) आचार्य अत्रे

(१४) बातमी लिहिताना समाजाच्या (वाचकाच्या) गरजांचा आणि त्यांच्या ........... विचार करणे आवश्यक असते.

(अ) सहनशीलतेचा (ब) ग्रहणशक्तीचा

(क) स्मरणशक्तीचा (ड) संहारकशक्तीचा

(१५) बातमी लिहिताना लेखकाला कशाची माहिती असायला हवी ?

(अ) संवादशास्त्र (ब) भाषाशास्त्र

(क) मुद्राक्षर रचनाशास्त्र (ड) शैलीशास्त्र

(१६) धर्म, साहित्य, राजकारण, समाजकारण, अर्थकारण, विज्ञान अशा विविध क्षेत्रांचा व ज्ञानशाखांचा केंद्रबिंदू कोण आहे ?

(अ) भाषा (ब) माणूस

(क) देश (ड) विश्व

(१७) मराठीतील पहिले वृत्तपत्र कोणते ?

(अ) केसरी (ब) दर्पण

(क) लोकमत (ड) तरुण भारत

(१८) कोणत्याही भाषेतील ..........., स्थलनामे यांचे भाषांतर होत नाही. ते मुळाप्रमाणेच ठेवावे.

(अ) सामान्य नामे, (ब) भाववाचक नामे

(क) विशेष नामे (ड) पदार्थवाचक नामे

(१९) मुलाखतीचा मुख्य हेतू कोणता ?

(अ) व्यक्तीचे दर्शन घडविणे (ब) व्यक्तीच्या कार्याचे दर्शन घडविणे

(क) व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडविणे (ड) व्यक्तीच्या नातेबंधाचे दर्शन घडविणे.

(२०) इंग्रजीत प्रथम कर्ता, मग क्रियापद आणि त्यानंतर कर्म या क्रमाने शब्द यावे लागतात तर मराठीत हा क्रम कसा असतो ?

(अ) कर्म, क्रियापद कर्ता (ब) क्रियापद, कर्म, कर्ता

(क) कर्ता, क्रियापद, कर्म (ड) कर्ता, कर्म, क्रियापद